सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थांच्या खरेदीसाठी केंद्रीय खरेदी समितीची स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१७/प्र.क्र. २७६/आरोग्य-८
नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपांउंड,
कॉम्पलेक्स बिल्डींग, १० वा मजला, मुंबई ४००००१
दिनांक: ०९ मार्च, २०१८

संदर्भ-

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी २०१७/प्र.क्र.२७६/आरोग्य -८, दिनांक ०५.१०.२०१७

प्रस्तावना -

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या सुधारीत खरेदी नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २.९.२ च्या तरतुदींनूसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थांकरीता करावयाच्या खरेदीसाठी (औषधे, तद्अनुषंगिक उपभोग्य वस्तु व वैद्यकीय उपकरणे या बाबी वगळून अन्य बाबींच्या खरेदीसाठी) संदर्भाधीन दिनांक ०५.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये केंद्रीय खरेदी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीमध्ये सहसचिव/उपसचिव, वित्त विभाग तसेच लेखा व कोषागार संचालनालयातील लेखाधिकारी (गट-अ) यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. लेखा व कोषागार संचालनालयातील गट-अ दर्जाचे लेखाधिकारी हे वित्त विभागाचेच प्रतिनिधी असल्याने केंद्रीय खरेदी समितीतून सहसचिव/उपसचिव, वित्त विभाग यांना वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थांकरीता करावयाच्या खरेदीसाठी (औषधे, तद्अनुषंगिक उपभोग्य वस्तु व वैद्यकीय उपकरणे या बाबी वगळून अन्य बाबींच्या खरेदीसाठी) संदर्भाधीन दिनांक ०५.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या केंद्रीय खरेदी समितीच्या सदस्यांमधून सहसचिव/उपसचिव, वित्त विभाग यांना वगळण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०९१५३८३००११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2018.03.09 15:09:27 +04'30'

(व.मुं.भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव, ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
३) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
४) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नाग़पूर
५) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
६) व्यवस्थापकिय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि.
७) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, मुंबई
९) प्रकल्प संचालक, एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई
१०) आयुक्त (विकास), उद्योग संचालनालय, मुंबई
११) मा.मंत्री (सा.आ. व कु.क.)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२) मा.राज्यमंत्री (सा.आ. व कु.क.)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
१४) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
१५) सहसचिव/उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) सहसचिव/उपसचिव, ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) सहसंचालक (भांख), उद्योग संचालनालय, मुंबई
१८) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२०) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
२१) सहसंचालक, आरोग्य सेवा(सर्व)
२२) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
२३) निवडनस्ती (आरोग्य-८)